**प्रेस नोट :-** दिनांक ०२/०४/२०१९

**दत्तवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर**

**"दत्तवाडी पोलीसांनी जोपासला सर्वधर्म समभाव"**

दत्तवाडी येथे हजरत राजा बागसवार दर्ग्याचा ऊरुस असल्याने दत्तवाडी पोलीसांच्या वतीने या दर्ग्याला शेरा वाहण्याचा कार्यक्रम मोठया भक्ती भावात पार पडला. दत्तवाऊी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे, पोनि गुन्हे राजेंद्र सहाणे, सहाय्यक पोलीस निरीक्षक शंकर सलगर, संजय चव्हाण, सुरेंद्र पाटील, नंदकुमार केंचे, पोलीस उप निरीक्षक मनोज अभंग, राजु पवार, सहाय्यक पोलीस उप निरीक्षक बाळासाहेब घावटे, पोहवा श्रिकांत शिरोळे, राहुल निगडे, पोलीस नाईक नवनाथ राणे, पोशि विशाल साळुंखे, नवनाथ भोसले, प्रमोद भोसले, राजेश साळवी यांनी शेरा अर्पण केला. दत्तवाडी पोलीस चौकी पासुन मिरवणुकीने दत्तवाडी दर्गा पर्यंत पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या बरोबर स्थानिक नागरिक मोठया प्रमाणावर सहभागी झाले होते.

सामाजिक एकोपा राखण्या करीता पोलीस विभाग हा सदैव कार्यरत असतो. प्रत्येक समाजाच्या आनंदामध्ये व सांस्कृतिक कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेवुन एक कौटुंबिक वातावरण निर्माण करणे या करीता आम्ही सदैव प्रयत्न करत आहोत असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे यांनी सांगितले.

**(देविदास घेवारे)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
दत्तवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर.

